संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# पाणीटंचाईची दाहकता शिगेला

**मे** महिना संपायला जवळपास वीस दिवस बाकी आहेत किंवा प्रत्यक्ष पाऊस पडण्यासाठीसुध्दा किमान दीड महिन्याची प्रतिक्षा करायला लागणार आहे. अशा परिस्थितीत सध्या राज्यातील दुष्काळी परिस्थिती फारच चिंताजनक झालेली दिसून येते. यावर्षी पाणीपुरवठा करणाऱ्या टँकरच्या संख्येने उच्चांक गाठला आहे. आतापर्यंत दुष्काळाच्या स्थितीत तीन ते साडेतीन हजार टँकर्सने पाणी पुरवले जात होते. आता ही संख्या जवळपास पाच हजारावर पोहचली आहे. राज्याच्या विविध भागात एवढ्या मोठ्या प्रमाणावर टँकरने पाणीपुरवठा होत असूनही दुष्काळग्रस्तांची आज तहान भागवू शकत नाही अशी आज परिस्थिती आहे. महत्त्वाची गोष्ट अशी आहे की राज्यातल्या सगळ्या प्रमुख धरणांमधला पाणीसाठा दहा ते पंधरा टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. हा पाणीसाठा जून महिना संपेपर्यंत टिकवून ठेवणे अत्यंत कठीण जाईल. कारण हवामान खात्याने पाऊस वेळेवर येईल असे कितीही आश्वासन दिले असले तरीसुध्दा धरणांमध्ये किंवा जलसाठ्यांमध्ये पाणी साठायला जून महिन्यानंतरच सुरुवात होते. जून महिन्यातला जवळपास सगळा पाऊस हा जमीनीत मुरत असतो. म्हणूनच पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक आखत असताना ग्रामीण भागात जून महिन्यापर्यंतची व्यवस्था केली जाते. तर महानगरांना पाणीपुरवठा करणाऱ्या जलसाठ्यांमध्ये जुलै संपेपर्यंत पाणी टिकवून ठेवण्याचे आव्हान पेलावे लागते. यावर्षी ग्रामीण भाग किंवा शहरी भाग दोन्ही ठिकाणच्या जलसाठ्यांची परिस्थिती अतिशय गंभीर झालेली दिसते. टँकरने पाणीपुरवठा करीत असताना ते पाणीसुध्दा कुठून आणायचे असे प्रश्न त्या त्या ठिकाणच्या जिल्हाधिकाऱ्यांपुढे उभे ठाकले आहेत. कारण एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात पाणी आणणे ही गोष्टदेखील अत्यंत जिकीरीची झालेली आहे. कोणताही जिल्हा आपल्याकडचे पाणी दुसरीकडे पाठवायला तयार नाही हीदेखील आजची वस्तुस्थिती आहे. प्रामुख्याने संपूर्ण मराठवाडा उत्तर महाराष्ट्रातले तीनही जिल्हे विदर्भाचा निम्म्यापेक्षा जास्त भाग आणि पश्चिम महाराष्ट्राचाही साठ टक्के भाग अतीदुष्काळाने म्हणजेच पाणीटंचाईने ग्रासला गेला आहे.

### बैलगाडी ते टँकर

१९७२ साली पडलेल्या भीषण दुष्काळाची आठवण यावेळी होताना दिसते. गेली चाळीस पन्नास वर्षे महाराष्ट्र दरवर्षी या अस्मानी संकटाशी सामना करीत असतो. इतकी वर्षे होऊनही सरकारला या गंभीर समस्येवरचे समाधानकारक उपाय सापडू नयेत हेदेखील तितकेच मोठे आश्चर्य म्हणावे लागते. अगदी १९७० च्या दशकामध्ये बैलगाड्यांमध्ये पिंप ठेवून दुष्काळी भागामध्ये पाणी पोहचवले जात होते. परंतु जसजशी त्याची तीव्रता वाढत गेली आणि टँकरचा पर्याय उपलब्ध झाल्याबरोबर दुष्काळाच्या काळात या पाणीपुरवठ्याचे कंत्राट पटकावणाऱ्या टँकरची एक लॉबी महाराष्ट्रात निर्माण झाली. यातील ९० टक्के टँकर्स हे राजकीय कार्यकर्त्यांचे किंवा नेत्यांचे असल्याचे आढळूनही आले होते. आणि मग प्रत्यक्ष पाणीपुरवठा न करता पैसे देण्याचे गैरप्रकारही त्याकाळात उघड झाले म्हणजे दुष्काळासारख्या अतिशय गंभीर परिस्थितीतही टाळूवरचे लोणी खाणाऱ्यांची संख्या त्या काळातही मोठी होती. आज टँकर्सच्याबाबतीतही असाच गैरव्यवहार अनेक ठिकाणी होताना दिसून येतो. म्हणूनच दुष्काळ म्हटल्यानंतर पाण्याची जरी टंचाई वाटत असली तरीदेखील गैरकारभार करणाऱ्यांची किंवा एका ठराविक लॉबीची तेवढीच चंगळ होत होती हेही तितकेच खरे आहे. म्हणूनच दुष्काळ ही समस्या जितकी नैसर्गिक आहे तितकीच ती मानवनिर्मितसुध्दा आहे असे म्हणायला पर्याय राहात नाही. दुष्काळी परिस्थितीत आपल्या टँकरचा व्यवसाय व्यवस्थित चालू राहावा अशी इच्छा किंवा व्यवस्था करणाऱ्यांची जर तितकीच मोठी संख्या असेल तर दुष्काळ निवारण्याचे नियोजन हे किती तकलादू स्वरुपाचे आहे याचादेखील उलगडा होतो. कारण टँकरने पाणीपुरवठा हा दुष्काळावरचा उपाय अशी एक परंपरागत ठाम समजूत प्रशासनाने आणि राज्यकर्त्यांनी करून घेतलेली आहे. आणि ती आजही तशीच कायम दिसते. म्हणजेच एक नैसर्गिक आपत्ती जरी असली तरी त्याच्या निवारणापेक्षाही तात्पुरत्या नियोजनावर राज्यकर्त्यांनी किंवा प्रशासनाने शक्ती आणि पैसा खर्ची घातल्याचेच आपल्याला पाहायला मिळते.

### प्रशासनातही दुष्काळ

आज ज्यावेळी टँकरनेसुध्दा दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याची वेळ आली आहे त्यावरून समस्येची तीव्रता लक्षात येते. त्यासाठी पैसा कमी पडू दिला जाणार नाही. अशा कितीही वल्गना सरकारने केल्यातरीसुध्दा आज पाणी कमी पडते आहे. ही अधिक भयावह वस्तुस्थिती म्हणावी लागेल. दरवर्षी दुष्काळी कामांसाठी खर्च होणारा निधी आणि त्याची गेल्या दहा वर्षातली गोळा बेरीज केली तर त्या पैशातून अनेक रखडलेले जलप्रकल्प मार्गी लागू शकले असते किंवा दुष्काळी भागात पाणी पुरवठ्याची परिस्थिती सुधारणाऱ्या योजना कार्यान्वितही करता आल्या असत्या. परंतु पुन्हा तोच प्रश्न निर्माण होतो. जलसंधारण प्रकल्प उभारण्यातही भ्रष्टाचार आणि दुष्काळी कामांच्या खर्चातही गैरकारभार म्हणजेच दुष्काळाचे निवारण व्हावे अशी राज्यकर्त्यांचीच प्रामाणिक इच्छा दिसत नाही. कदाचित या गोष्टी आता जनतेच्याही लक्षात येऊ लागल्याने आपापल्या परिसरातील पाणीपुरवठा सुधारण्यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या मार्फत पुढाकार घेतला जातो. श्रमदानातून काही व्यवस्था निर्माण करण्याबाबत जनजागृती झाल्याचेही पाहायला मिळेल. परंतु याचा अर्थ सरकारला या कामासाठी उपलब्ध असलेला पैसा वाटेल त्या पध्दतीने खर्च करता येणार नाही. तो त्याच कामांसाठी वापरण्याची जबाबदारी पार पाडावी लागेल. यावर्षीच्या दुष्काळाने जलसंधारणातील उदासिनता दुष्काळी कामाच्या नियोजनातील बेजबाबदारपणा या गोष्टींवर पुन्हा एकदा प्रकाश टाकलेला आहे. सर्वाधिक पाणीपुरवठा करण्यासाठी सर्वाधिक टँकरची संख्या ही गोष्ट काही भूषणावह ठरत नाही. उलट राज्यकर्ते बदलले तरी कामाची पध्दत बदललेली नाही. तिथेदेखील उत्तम प्रशासनाचा दुष्काळच पाहायला मिळाला.